नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ६६ Issue - 66 | वार बुधवार दि. २३ जुलै २०२५ Blow- Wednesday Date 23 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदार यादीतून ५१ लाख मतदारांची नावे हटवली

## निवडणूक आयोगाकडून आकडेवारी जाहीर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगानं म तदार यादीचं स्पेशल इंटेसिव्ह रिव्हिजन अभियान सुरु केलं आहे. निवडणूक आयोगानं एसआयआरद्वारे ५१ लाख मतदारांची नावं मतदार यादीतून हटवली आहेत. आयागोनं यासंदर्भातील माहिती दिली आहे.

निवडणूक आयोगानं एसआयर मध्ये १८ लाख नावं मृत मतदारांची आढळून आल्याचं म्हटलं. त्याशिवाय २६ लाख मतदार बिहारच्या बाहेर किंवा इतर मतदारसंघात स्थलांतरित झाले आहेत. त्यामुळं त्यांची नावं हटवण्यात आली आहेत. याशिवाय ७ लाख मतदारांची नावं दोन ठिकाणी नोंदवली गेल्यानं ती हटवण्यात आली आहे. नियमानुसार एकाच मतदारसंघात नाव नोंदवता येतं. मात्र, नियमांचं उल्लंघन केल्यानं ही नावं हटवली गेली आहेत. म्हणजेच एकूण ५१ लाख नावं बिहारच्या मतदार यादीतून हटवण्यात आली आहेत.

निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार बिहारमध्ये ७.८९ कोटी नोंदणीकृत मतदारांपैकी ९७.३० टक्के मतदारांनी एर्पीाशीरींळेप ऱ्रेीी जमा केले आहेत. या फॉर्मची गरज १ ऑगस्ट २०२५ ला प्रकाशित होणाऱ्या प्राथमिक मतदार यादीत नावाचा समावेश आवश्यक आहे. आतापर्यंत २.७० टक्के मतदारांनी अर्ज जमा केलेले नाहीत.आयोगानं या प्रक्रियेला पारदर्शक आणि सर्वसमावेशक बनवण्यासाठी प्रयत्न केल्याचं सांगितलं. ९८५०० हून अधिक बीएलओ आणि १.५ लाख बूथ लेवल एजेंटचा समावेश आहे.

सुप्रीम कोर्टानं १० जुलै रोजी निवडणूक आयोगाला आधार कार्ड, मतदार कार्ड आणि रेशन कार्डला वैध कागदपत्र म्हणून मान्यता द्यावी असे निर्दे श दिले होती. निवडणूक आयोगाचा मात्र याला आक्षेप आहे. निवडणूक आयोगानं यासंदर्भातील प्रतिज्ञापत्र सादर केलं आहे.

निवडणूक उपायुक्त संजय कुमार यांच्याकडून दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रात हा उल्लेख करण्यात आला आहे. त्यांनी म्हटलं की आता मतदार यादीची पडताळणी आणि सुधारणा केली जात आहे. सध्या ज्या लोकांकडे मतदान कार्ड आहे ते जुन्या मतदार यादीवर आधारित दिलं गेलं होतं. त्याचाच आधार नवी यादी बनवताना घेतला गेल्यास सर्व प्रयत्न फोल ठरतील असं म्हटलं.

निवडणूक आयोगानं रेशन कार्ड बाबत भूमिका मांडताना म्हटलं की रेशन कार्ड हे विश्वसनीय कागदपत्र नाही. मोठ्या संख्येनं बोगस कार्ड बनवण्यात आली आहे. या वर्षी भारत सरकारनं ५ कोटी बोगस रेशन कार्ड रद्द केल्याची माहिती देखील आयोगानं दिली. आयोगानं एसआयआर दरम्यान आधार, रेशन कार्ड, जुन मतदान कार्ड ही कागदपत्र स्वीकारणार असल्याचं म्हटलं. मात्र, त्यासोबत विश्वसनीय कागदपत्र द्यावं असं म्हटलं आहे. या कागदपत्रांना स्वीकारण्याचा किंवा फ टाळण्याचा निर्णय स्थानिक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांवर किंवा सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांवर अवलंबून असेल.

# 'शेतकरी नाही, शासन भिकारी' ; कृषीमंत्री कोकाटे यांचे वादग्रस्त वक्तव्य




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. कोकाटे यांचा विधीमंडळाच्या सभागृहात कथित रम्मी खेळत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्या व्हिडीओवरुन विरोधकांकडून त्यांच्यावर निशाणा साधला जात होता. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील माणिकराव कोकाटे यांना फटकारलं होतं. या सगळ्या घडामोडींनंतर माणिकराव कोकाटे यांनी आज पत्रकार परिषद घेत सविस्तर भूमिका मांडली. यावेळी माणिकराव कोकाटे यांनी व्हिडीओ प्रकरणी चौकशी करावी. आपण त्यात दोषी ठरलो तर स्वत:हून राज्यपालांकडे मंत्रिपदाचा राजीनामा सुपूर्द करु, असं कोकाटे म्हणाले. याच पत्रकार परिषदेत माणिकराव कोकाटे आणखी वादग्रस्त बोलून गेले आहेत. त्यामुळे विरोधकांच्या हाती आयतं कोलित सापडलं आहे. माणिकराव कोकाटे यांनी कळत-नकळत सरकारलाच भिकारी म्हटलं आहे. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

माणिकराव कोकाटे यांनी काही महिन्यांपूर्वी पीक विमा योजनेवरुन शेतकऱ्यांबद्दल वादग्रस्त विधान केलं होतं. भिकारी सुद्धा एक रुपया घेत नाही आणि आम्ही एक रुपयात पीक विमा देतो. त्याचा लोकांनी गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला, असं वक्तव्य माणिकराव कोकाटे यांनी केलं होतं. त्यांच्या या वक्तव्यावरुन वाद निर्माण झाला होता. याच वक्तव्याबाबत आजच्या पत्रकार परिषदेत माणिकराव कोकाटे यांना प्रश्न विचारण्यात आला. यावेळी प्रतिक्रिया देताना माणिकराव कोकाटे पुन्हा एकदा नको तेच बोलून गेले. शेतकऱ्यांकडून १ रुपया शासन घेतं. शेतकऱ्यांना आम्ही एक रुपया देत नाही. शेतकऱ्यांकडून एक रुपया शासन घेतं. भिकारी कोण आहे? शासन आहे. शेतकरी नाही. बरं त्याचा नेमही अर्थ उलटा केलेला आहे. एक रुपया ही किंमत फार थोडी आहे. एक रुपया विम्यामुळे महाराष्ट्रात साडेपाच लाख बोगस अर्ज सापडले, असं वक्तव्य माणिकराव कोकाटे यांनी केलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी माणिकराव कोकाटे यांच्या वक्तव्यावर टीका केली आहे. संयुक्त म हाराष्ट्राच्या लढ्यात १०५ हुतात्म्यांच्या बलिद-ानातून साकारलेल्या महाराष्ट्राचा मंगलकलश स्व यशवंतराव चव्हाण साहेब यांनी आणला. त्यानंतर आलेल्या शासनकर्त्यांनी आणि राज्यातील जनतेने कठोर परिश्रम करुन हा महाराष्ट्र देशातील सर्वात संपन्न असे राज्य बनविले. त्या राज्याला 'भिकारी' म्हणणे हा असंवेदनशीलतेचा कहर आहे. हा राज्याचे आतापर्यंतचे मुख्यमंत्री आणि राज्यातील जनतेच्या परिश्रमाचा अपमान आहे.

# राज्यात पुढील चार दिवस मुसळधार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात पुढील चार दिवस म ुंबई उपनगरासह संपूर्ण कोकणपट्टी तसेच घाट माथ्यावर पावसाचे तीव्र अलर्ट देण्यात आले आहेत. संपूर्ण विदर्भात पावसाचा जोर वाढणार आहे. बहुतांश ठिकाणी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात पुढील चार दिवस पावसा-ची उघडीप राहणार असून तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची नोंद होईल असे हवामान विभागाने सांगितले आहे .

मुंबईसह कोकणकिनारपट्टीवर पुढील काही तास अत्यंत महत्त्वाचे राहणार आहेत. मुंबई शहरात पुढील ३ ते ४ तासांत जोरद-ार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. सोमवारी सायंकाळी ६:२० वाजता भारतीय हवामान खात्याच्या मुंबई प्रादेशिक केंद्राने 'छे-लर्रीं थरीपळपस' जारी केली असून, मुंबई शहरातील काही भागांमध्ये मध्यम ते तीव्र स्वरुपाच्या सरी कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस अरबी समुद्रात उंचच उंच लाटा उसळणार असून लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली.

मुंबई शहरात सोमवारपासूनच हलक्या सरींचं आगमन सुरू असून, सायंकाळनंतर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही भागांत रस्त्यांवर पाणी साचण्याची परिस्थिती उद्भवू शकते. कार्यालय सुटण्याच्या वेळेस नागरिकांची वर्दळ वाढलेली असते, त्यामुळे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. केवळ मुंबई शहरातच नव्हे तर कोकण किनारपट्टीसाठीही एक महत्त्वाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्राकडून सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्ह्यांच्या किनारपट्टीस २३ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५:३० पा-सून ते २४ जुलै २०२५ रात्री ८:३० वाजेपर्यंत ३.६ ते ४.३ मीटर उंच लाटा उसळण्याची शक्यता आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित्त भाजप कार्यालयात आयोजित शिबीरात ५७४ जणांनी केले रक्तदान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी : रक्तदान हे श्रेष्ठ असून यात अक्कलकोट विधानसभा म तदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे नेते, कार्येकर्त्यांनी भरघोस प्रतिसाद द्यावे असे आव्हान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाकडून आलेल्या सूचने प्रमाणे एकाच दिवशी संपूर्ण राज्यात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार अक्कलकोट येथे भाजप कार्यालयात आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात तब्बल ५७४ रक्तदान जणानी रक्तदान केले.

सदर शिबीराचे शुभारंभ आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. त्या प्रसंगी आमदार बोलत होते. प्रारंभी भारतमाता व श्री स्वामी समर्थ महाराज प्रतिमा पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, मि लन कल्याणशेट्टी, जिल्हा अध्यक्ष शशिकांत चव्हाण, सागर कल्याणशेट्टी, मनोज कल्याणशेट्टी, सुदर्शन यादव, विकास वाघम रे, मंडळ अध्यक्ष प्रदीप पाटील, सुनील खेड, अमोल हिप्परगी, जेष्ठ प्रभाकर म जगे, शिवशरण जोजन, शिवशरण वाले, मल्लिनाथ स्वामी, प्रवीण शहा, संजय भागानगरे, सुनील गवंडी, मोतीराम राठोड, महेश हिंडोळे, आनंद तानवडे, परमेश्वर यादवाड, गिरमल गंगोंडा, सभापती अप्पू परमशेट्टी, आणप्पा बाराचारी, सुरेश नागुर, आप्पासाहेब बिराजदार, शंकर भांजी, म हेश पाटील, राजेंद्र बंदीछोडे, सुरेश गड्डी, रामचंद्र अरवत, सुनील सिद्धे, बसवराज हौदे, स्वामींनाथ हिप्परगी, शिवलिंग स्वामी,जयशेखर पाटील, राजशेखर हिप्परगी, शिवराज स्वामी, नागराज कुंभार, शबाब कोरबू,कांतू धनशेट्टी, अविनाश मडीखांबे, उत्तम गायकवाड, नंनू कोरबू, यशवंत धोंगडे, अप्पू पराणे, रजाक सय्यद, सुनील दसले,अंकुश चौगुले, विक्रम शिंदे, श्रीकांत झिपरे, कल्याणी बिराजदार, दिनेश पटेल,चंद्रकांत दसले यांच्यासह तालुक्यातील विविध गावचे सोसायटी चेअरमन, सरपंच, उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य,माजी नगरस-ेवक, माजी पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य,प्रतिष्ठित व्यापारी, नागरिक आदीजण उपस्थित होते.

यावेळी गोरक्षक दिना निमित्त वीस गोरक्षकांचे शाल, श्रीफळ, देऊन सन्मान करण्यात आले.



दैनिक
# यश सिद्धि न्यूज
बुधवार दि. २३ जुलै २०२५


## संपादकीय....

### निवडणूक आयोगाची कारवाई

बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगानं मतदार यादीचं स्पेशल इंटेसिव्ह रिव्हिजन अभियान सुरु केलं आहे. निवडणूक आयोगानं एसआयआरद्वारे ५१ लाख मतदारांची नावं मतदार यादीतून हटवली आहेत. निवडणूक आयोगानं एसआयर मध्ये १८ लाख नावं मृत मतदारांची आढळून आल्याचं म्हटलं. त्याशिवाय २६ लाख मतदार बिहारच्या बाहेर किंवा इतर मतदारसंघात स्थलांतरित झाले आहेत. त्यामुळं त्यांची नावं हटवण्यात आली आहेत. याशिवाय ७ लाख मतदारांची नावं दोन ठिकाणी नोंदवली गेल्यानं ती हटवण्यात आली आहे. नियमानुसार एकाच मतदारसंघात नाव नोंदवता येतं. मात्र, नियमांचं उल्लंघन केल्यानं ही नावं हटवली गेली आहेत. म्हणजेच एकूण ५१ लाख नावं बिहारच्या मतदार यादीतून हटवण्यात आली आहेत. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार बिहारमध्ये ७.८९ कोटी नोंदणीकृत मतदारांपैकी ९७.३० टक्के मतदारांनी एर्पीाशीर-ींळेप ऱ्ेींाी जमा केले आहेत. या फॉर्मची गरज १ ऑगस्ट २०२५ ला प्रकाशित होणाऱ्या प्राथमिक मतदार यादीत नावाचा समावेश आवश्यक आहे. आतापर्यंत २.७० टक्के मतदारांनी अर्ज जमा केलेले नाहीत.आयोगानं या प्रक्रियेला पारदर्शक आणि सर्वसमावेशक बनवण्यासाठी प्रयत्न केल्याचं सांगितलं. ९८५०० हून अधिक बीएलओ आणि १.५ लाख बूथ लेवल एजेंटचा समावेश आहे. सुप्रीम कोर्टानं १० जुलै रोजी निवडणूक आयोगाला आधार कार्ड, मतदार कार्ड आणि रेशन कार्डला वैध कागदपत्र म्हणून मान्यता द्यावी असे निर्देश दिले होती. निवडणूक आयोगाचा मात्र याला आक्षेप आहे. निवडणूक आयोगानं यासंदर्भातील प्रतिज्ञापत्र सादर केलं आहे. सध्या ज्या लोकांकडे मतदान कार्ड आहे ते जुन्या मतदार यादीवर आधारित दिलं गेलं होतं. त्याचाच आधार नवी यादी बनवताना घेतला गेल्यास सर्व प्रयत्न फोल ठरतील असं म्हटलं. निवडणूक आयोगानं रेशन कार्ड बाबत भूमिका मांडताना म्हटलं की रेशन कार्ड हे विश्वसनीय कागदपत्र नाही. मोठ्या संख्येनं बोगस कार्ड बनवण्यात आली आहे. या वर्षी भारत सरकारनं ५ कोटी बोगस रेशन कार्ड रद्द केल्याची माहिती देखील आयोगानं दिली.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शहर मध्य मतदारसंघात विक्रमी ९४३ रक्तदान

## आमदार देवेंद्र कोठे यांचा पुढाकार; तीन शिबिरात लागल्या रक्तदानासाठी रांगा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शहर मध्य विधानसभा मतदारसंघात मंगळवारी ९४३ जणांनी विक्रमी रक्तदान केले. शहर मध्य मतदारसंघात तीन ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.




वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च न करता रक्तदान शिबिरे आणि समाजोपयोगी कामासाठी तो पैसा खर्च करावा असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत आमदार देवेंद्र कोठे यांनी एमआयडीसी येथील बालाजी मंगल कार्यालय, मोदी येथील श्री अष्टभुजा मंदिर आणि लष्कर बेडर पूल येथील श्री अंबाबाई देवस्थान येथे रक्तदान शिबिर भरविले होते. बोल्ली रक्तपेढी, मल्लिकार्जुन ब्लड बँक, मेडिकेअर ब्लड सेंटर, सोलापूर ब्लड बँक, अथहर ब्लड बँक, सिद्धेश्वर ब्लड बँक यांनी रक्तसंकलन केले.

याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, अविनाश महागावकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी स्थायी समिती सभापती विनायक कोंड्याल, माजी शहराध्यक्ष रामचंद्र जन्नु, माजी सभागृह नेता देवेंद्र भंडारे, सोलापूर शहर मध्य विधानसभा मध्यपूर्व मंडल अध्यक्ष अक्षय अंजिखाने, मध्य-मध्य अध्यक्ष नागेश सरगम, मध्य पश्चिम मंडल अध्यक्ष नागेश खरात, माजी नगरसेवक रवी कैय्यावाले, माजी नगरसेवक मेघनाथ येमुल, राजकुमार हंचाटे, भारतसिंग बडुरवाले, माजी नगरसेवक अनिल पल्ली, जेम्स जंगम, माजी नगरसेविका मीनाक्षी कम्पल्ली, रामेश्वरी बिर्रू, अंबादास करगुळे, सिद्धाराम खजूरगी,विठ्ठल कोटा,सारिका सुरवसे,राजेश अनगिरे,काशिनाथ झाडबुके, भूपती कमटम,बजरंग कुलकर्णी, यशवंत पाथरूट, दिलीप पतंगे, राजा माने, रमेश यन्नम,आनंद बिर्रु, दत्तात्रय पोसा, माजी नगरसेवक मधुकर वडनाल, संतोष कदम, अविनाश बेंजरपे, ,रवी कोळेकर,सिद्धेश्वर कमटम,अजय यादव, अंबादास बिंगी, जय साळुंके, अंबादास सकीनाल, विजय महिंद्रकर,सिद्धराम ख्याडे,मनोज कलशेट्टी,सुनील दाते, प्रशांत पल्ली विश्वनाथ प्याटी,मनोज पिसके, बाबुराव क्षीरसागर,सतीश तमशेट्टी,किरण भंडारी,सतीश सुरवसे,सुरज बंडगर,तुषार पवार,अक्षय वाकसे,बाबू उपळेकर, सुरेश मोडे, बाबुराव सांगेपग, संजयकुमार कांती, नवनाथ साळुंखे, रुपेश जक्कल, रतीकांत कमलापूरे, समशेरसिंग आंबेवाले, रणजीत दवेवाले, गुलजारसिंग शिवसिंगवाले, सुनील पाताळे, श्रीनिवास जोगी, अनंत गोडलोलु, संदीप ढगे, प्रसाद पल्ली, सुनील गौडगाव, अर्जुन नामदास, अभिषेक चिंता, मुकेश हजारीवाले, नागेश म्हेत्रे आदींची उपस्थिती होती.

**महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक दशकांपासून चालत आलेल्या त्यांचा सामाजिक वारसा कायम ठेवत यंदाही वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च न करता सामाजिक उपक्रम राबवण्याचे आवाहन आम्हा कार्यकर्त्यांना केले होते. त्यानुसार ही रक्तदान शिबिरे झाली. शहर मध्य मतदारसंघात झालेले विक्रमी रक्तदान हे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरील जनतेच्या प्रेमाचे प्रतीक आहे.**

**– देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

### मतदानाप्रमाणे रक्तदानासाठीही रांगा

**आमदार देवेंद्र कोठे यांची विशेषत: शहर मध्य विधानसभा मतदारसंघात प्रचंड लोकप्रियता आहे. विधानसभा निवडणुकीत मतदानासाठी रांगा लागल्याचे चित्र दिसून येत होते. परिणामी देवेंद्र कोठे यांचा ५० हजारांच्या मताधिक्याने विजय झाला. आमदार देवेंद्र कोठे यांनी मतदानानंतर रक्तदानाचे आवाहन केल्यानंतर नागरिकांनी ९४३ इतक्या प्रचंड संख्येने रक्तदान करून प्रतिसाद दिला.**

## चोरट्यांचा चोरीचा नवा फंडा: पोलीस असल्याची बतावणी करून भर दिवसा भामट्याने महिलेला लुटले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

दिनांक २० जुलै रोजी ५.३० च्या सुमारास फिर्यादी व फिर्यादीच्या बहिणीची मुलगी रंजना मोरे असे वॉकिंग करण्याकरिता खरेदीच्या घरापासून सोलापूरकडे जाणारा बायपास रोड वरून बनशंकरी कॉलनी कडे जाणाऱ्या रोड वरून पायी जात असताना समोर एक मोटरसायकल थांबून अनोळखी माणूस उभारलेला दिसला त्यांनी मला सांगितले की मी पोलीस आहे मला पोलीस ठाण्याकडून रोज संध्याकाळी पायी चालत जाणाऱ्या येणाऱ्या लोकांवर नजर ठेवण्यासाठी ड्युटी नेमले आहे.

मी पोलिसाचा आहे असे सांगून पुढे चोऱ्या होत आहेत तुमच्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून ठेवा व त्या सुरक्षित राहतील असे म्हणल्यावर फिर्यादी घाबरून हातातील पाच तोळ्याच्या सोन्याच्या पाटल्या काढत असताना त्यांनी त्याच्याकडून कागद फिर्यादी समोर धरला व पुढे तिच्या बांगड्या त्यात घातल्या व त्याने कागद उडान फिर्यादीकडे परत दिले.

त्यानंतर फिर्यादी परत घरी येत असताना सुमारे अर्ध्या तासानंतर सदर कागद उघडून बघितले असता सदर कागदामध्ये दोन सोन्याच्या पाटल्या ऐवजी त्या तीन नकली पिवळे धातूच्या बांगड्या व छोट्यासा दगड दिसून आले.

या घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर हे करीत आहेत.

## नेतृत्व म्हणजे देवेंद्र फडणवीस; राज्यामध्ये जो चोफेर विकास दिसत आहे तो त्यांच्यामुळे : भाजप नेते सूर्यकांत पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

सुसूत्रता, बेरोजगारांसाठी वनवीन नवकार्यांची संधी नवनवीन महामार्गाच्या विकासाच्या त्यांना देणाऱ्या कार्यामुळे महाराष्ट्र संपूर्ण भारतामध्ये अग्रेसर ठरत आहे आगामी काळामध्ये स्वयंपूर्ण खेळी तसेच महानगराचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही विरोधकांवरून कितीही टीका झाली तरीही आपल्या प्रामाणिक कार्यादा तसा त्यांनी सोडला नाही.

तसेच कार्यकर्त्यांची जाण असणारा नेता म्हणजे देवेंद्र फडणवीस, असं खंबीर नेतृत्व भाजपला मिळालेले आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.



यावेळी संस्थेच्या विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला व संस्थेच्या वतीने स्वागत सातपुते सर यांनी केले यावेळी अण्णासाहेब रुपनर, मनोज कुलकर्णी, दादासाहेब पाटील, युवा सेनेचे बाळासाहेब तनपुरे ,आधी जण उपस्थित होते.

तसेच पंढरपूर गोरक्षण संस्थेमध्ये चारावाटप करण्यात आला यावेळी भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव दीपक चव्हाण, भाजप नेते सूर्यकांत पाटील, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार, भाजपा शहर उपाध्यक्ष सचिन चव्हाण, भाजप ज्येष्ठ नेते संजय घोरपडे ,माजी नगरसेवक किरण बोकन ,दिनेश मडके, पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे भरत शेठ गांधी, जाकीर पठाण विपुल गांधी, आभार पठाण आधी जण उपस्थित होते.

## मातोश्री गुनाबाई बनसोडे यांचे दु:खद निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी :



परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव मारुती बनसोडे यांच्या मातोश्री गुणाबाई तात्याराव बनसोडे रा.बोरगाव (तुपाचे) ता. तुळजापूर यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी वृद्धापकाळी अजाराने आज दिनांक २१/७/२२५ रोजी दुपारी ठिक ३ वाजता दुःखद निधन झाले आहे.

उद्या दि.२२ जुलै रोजी सकाळी १० वा.बोरगाव (तुपाचे ) ता.तुळजापूर येथे त्यांच्या पार्थिवावर अत्यंसांस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा,एक मुलगी, जावाई, सुन, नातवंडे असा परिवार आहे. कालकथित मातोश्री गुनाबाई तात्याराव बनसोडे यांच्या दुःखद निधना बद्दल त्याना भावपूर्ण आदरांजली.

## विविध उपक्रमांतून इंदापूर येथे मुख्यमंत्री फडणवीस यांचा जन्मदिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे



महाराष्ट्र राज्याचे तरुण तडफदार व कृतिशील नेतृत्व म्हणजे आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आज इंदापूर तालुका भारतीय जनता पार्टीच्यावतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

राधिका रेसिडेन्सी क्लब इंदापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराच्या निमित्ताने तालुक्यातील रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी तब्बल ४८० रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. नागरिकांसाठी अहोरात्र झटणाऱ्या महाराष्ट्र प्रमुखाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आम्ही स्वयंप्रेरणेतून रक्तदान करण्यास इथवर आलो आहोत अशी प्रतिक्रिया यावेळी राधिका रेसिडेन्सी क्लब येथे आलेल्या रक्तदात्यांनी दिली.

यासह इंदापूर येथील श्रावण बाळ अनाथाश्रम शाळा या ठिकाणी देखील श्री प्रवीण माने यांनी गरजू शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे फळांचे व सोनाई दूध चे वाटप केले व येथे विद्यार्थ्यांसमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा केकही कापला तसेच माने यांनी तो सर्व विद्यार्थ्यांना आवर्जून भरवला.

तसेच इंदापूर येथील श्री समर्थ व्यायाम मंडळ संचलित मूकबधिर निवासी शाळा येथेही माने यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व दुधाचे वाटप केले. याविषयी आपले मत व्यक्त करताना 'आपल्या लाडक्या नेत्याचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमातून साजरा व्हावा हा उद्देश मनात बाळगून आपण या कार्यक्रमाचे आयोजन केले' असल्याचे प्रतिपादन यावेळी भाजपा नेते प्रविण माने यांनी केले.

''महाराष्ट्र सेवक...'' या समर्पित भावनेतून राज्याचे नेतृत्व करणारे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस हे जनतेशी असलेली आपली बांधीलकी जपत सातत्याने महाराष्ट्राच्या हिताचे निर्णय घेत असल्याने प्रत्येक कार्यकर्ता हा त्यांच्याकडे आकर्षित होत असतो, आणि यातूनच समाजाची सेवा करण्याची संधी आपल्याला मिळत असते अशी प्रत्येक भाजपा कार्यकर्त्याच्या मनात असलेली भावना यावेळी माने यांनी बोलून दाखवली.

आजच्या सामाजिक उपक्रमाच्या निमित्ताने मयूर पाटील, आकाश कांबळे, मारुती वणवे, माऊली चवरे, बाबासाहेब चवरे, सदानंद शिरदाळे, गजानन वाकसे, तेजस देवकाते, राजकुमार जठार, किरण गाणबोटे, राम आसबे, तानाजी थोरात, नानासाहेब शेंडे, रमेश खारतोडे, अशोक वणवे, सचिन आरडे, माऊली वाघमोडे,सचिन सावंत,लखन जगताप,हर्षवर्धन कांबळे, बिभीषण लोखंडे, रविंद्र देवकर, अमोल मुळे, चांगदेव ढुके,रमेश पाटील, तानाजी मारकड, भारत बोंगाणे,रमेश पाटील, आप्पासाहेब गायकवाड, अँड मयूर शिंदे, सुधिर कोकाटे, शिवाजी देवकर आदी उपस्थित होते.

## पंढरीत पावसामुळे ज्ञानेश्वर नगर झोपडपट्टी मध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे प्रचंड हाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- प्रतिनिधी- काल पंढरपूर शहरामध्ये जोरदार पाऊस झाला या पावसामुळे नागरिकांचे व भावीक भक्तांचे अचानक आलेल्या पावसाने प्रचंड हाल झाले त्याचप्रमाणे या पावसामुळे ज्ञानेश्वर नगर झोपडपट्टी मध्ये घराघरांमध्ये या पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांची ताळमळ उडली नागरिकांचे अतोनात हाल झाले वास्तविक पाहता पाण्याचा निसराव होण्यासाठी नगरपालिकेने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे होते परंतु नगरपालिकेने कोणत्याही प्रकारच्या पाण्यानेचा निचरा होण्याच्या दृष्टिकोनातून कोणत्याही प्रयत्न न केल्याने सदर पावसाचे पाणी या झोपडपट्टीतील नागरिकांच्या घरामध्ये शिरल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे नगरपालिकेने या होणाऱ्या त्रासाची सहानुभूतीपूर्वक विचार करून या नागरिकाची घरामध्ये पाणी न जाण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याची आता मागणी होत असून लवकरात लवकर उपाय योजना करावी अन्यथा तेथील रहिवाशांनी आंदोलनाचा पवित्रा येणार घेणार असल्याची नागरिकात बोलले जात होते





हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# धक्कादायक! निवासी आश्रमशाळेत ८ वर्षीय चिमुकल्याचा खून

## अल्पवयीन मुलांनीचं ठार मारलं; जालन्यात खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जालना : काही दिवसांपूर्वी एका शाळेत विद्यार्थ्याचा त्याच शाळेतील विद्यार्थ्यांकडून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली होती. त्यानंतर, आता जालन्यातूनही अशीच खळबळजनक घटना समोर आली आहे. किरकोळवादातून निवासी आश्रम शाळेतील ८ वर्षाच्या मुलाची हत्या करण्यात आली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे मुलांच्या वसतिगृहात राहणाऱ्या दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांकडूनच दोरीने गळा आवळून त्याचा खून करण्यात आल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. याप्रकरणातील दोन विधी संघर्ष बालक भोकरदन पोलिसांच्या ताब्यात आहेत. तर, ही आश्रमशाळा काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेभाऊ देशमुख यांच्या मालकीची असल्याची माहिती आहे. या घटनेनं सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

जालना जिल्ह्यात भोकरदन येथील गणपती विद्यालय निवासी आश्रम शाळेच्या वसतिगृहामध्ये किरकोळ वादातून एका ८ वर्षीय विद्यार्थ्यांचा दोरीने गळा आवळून खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. बालवीर पवार असं मयत विद्यार्थ्याचं नाव आहे. मध्यरात्री १२ वाजताच्या सुमारास किरकोळ वादातून वसतिगृहात सोबत राहणाऱ्या ८ वर्षीय आणि १३ वर्षीय दोन दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांनी या ८ वर्षीय विद्यार्थी बालवीरचा दोरीने गळा आवळून खून केल्याचं समोर आलं आहे.

याप्रकरणी भोकरदन पोलिसांनी दोन विधी संघर्ष बालकांना ताब्यात घेतल असून या दोघांनी या हत्येची कबुली दिल्याची माहिती जालन्याचे पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी दिली. दरम्यान, खेळताना झालेल्या वादातून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून पोलिस अधीक तपास करत आहेत.

भोकरदन येथील या अल्पवयीन हत्याप्रकरणाने जिल्ह्यात खळबळ उडाली असून चिमुकल्या मुलाचा जीव गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला होता. तर, मृत बालवीरच्या नातेवाईकांचा आक्रोश मन हेलावून टाकणारा होता.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी

महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री मा श्री देवेंद्र फडणवीस यांच्या ५४ वा वाढदिवसानिमित्त तालुक्यातील कदेर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भारतीय जनता पार्टीचे उमरगा तालुकाध्यक्ष सिध्देश्वर माने, सरचिटणीस विठ्ठल चिकुंद्रे तसेच युवा मोर्चा तालुका अध्यक्ष उमाजी मंडले, स्वास्तिक विवेक कलशेट्टी, साईनाथ भीम दिक्षित, यशपाल कांबळे,सुशिलकुमार शिंदे, विवेकानंद चौधरी, तंटा मुक्त अध्यक्ष महादेव साखरे,बापुसाहेब काळे, प्रविण सुर्यवंशी, विठ्ठल गायकवाड या मान्यवरांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.पुस्तक वही पेन त्याचबरोब मिष्ठान्न जलेबी, पारले बिस्किट, खाऊ वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुंभार गोविंद तर आभार प्रदर्शन सगर प्रदिपकुमार यांनी केले.कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी श्रीमती औरादे, जोगे, प्रशांत पाटील, पुजारी रतन आदि मान्यवर उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुकबधीर विद्यार्थ्यांना खिचडी व खाऊ वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : राज्याचे कर्तव्यदक्ष व लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त कै. बाळासाहेब जिरगे प्रतिष्ठान, अक्कलकोटच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमाअंतर्गत मुकबधीर निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना खिचडी व खाऊ वाटप करण्यात आले. प्रतिष्ठानचे सचिव ओम जिरगे यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमावेळी महेश करपे, मोनेश नरेगल, आकाश चौगुले, सिद्धाराम अळवीकर, विशाल लालंसगी, शिवानंद पुजारी तसेच शाळेचे शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले असून,विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य ठरला.

## कृषीमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, काँग्रेसची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने कृषिमंत्र्यांनी राजीनामा द्यावा ह्या मागणीचे निवेदन दिले.

आज अक्कलकोट तहसील कार्यालयात नायब तहसीलदार मा.भंडारी साहेब यांना अक्कलकोट तालुका काँग्रेस आय कमिटीच्या वतीने तालुका अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांच्या नेतृत्वाखाली तालुका युवक अध्यक्ष निशांत कवडे यांनी निवेदन दिले.



सध्या महाराष्ट विधानसभेमध्ये पावसाळी अधिवेशन सुरू आहे. राज्यातील अनेक गंभीर प्रश्न सरकारसमोर असतानादेखील बेजबाबदार सरकार आणि सरकारमधील मंत्री रोज एक ना अनेक महाराष्ट्राला लाजिरवाणे प्रताप करीत आहेत हा उभा महाराष्ट्र डोळ्यांनी पाहत आहे. काल विधानसभेत चर्चासत्र सुरु असताना राज्याचे बेजबदार कृषी मंत्री माणिकराव कोकाटेनी ऑनलाइन रम्मी जुगार खेळण्याचा प्रताप करीत असताना उभ्या महाराष्ट्रांनी पाहिले.याचे जागोजागी पडसाद उमटले छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सत्ताधाऱ्यांना सदर घटनेची विचारणा केली असता मारहाणीचे प्रकार देखील समोर आले. राज्याचे असंवेदनशील सरकार कशा प्रकारे राज्यकारभार करत आहे याबाबत जनतेमध्ये तीव्र नाराजी आहे. म्हणून राज्याच्या कृषिमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारुन राजीनामा द्यावा अशा आशयाचे निवेदन देण्यात आले.

यावेळी अक्कलकोट युवक काँगेस आय पक्षाचे अध्यक्ष निशांत कवडे, तालुका अल्पसंख्यांक अध्यक्ष मौलाली पठाण,तगछ्ढ शहर अध्यक्ष श्री विलास राठोड, श्री सतीश सलगरे श्री मल्हारी हल्लुरे श्री गंगाधर बंदीछोडे, श्री प्रकाश पवार, श्री रोहीत कोळी आदी जण उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त विठु रखुमाई मंदिरात तुळशीपुजन व नामदेव पायरी येथे महाआरती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधत आमदार समाधान दादा आवताडे यांच्या माध्यमातून पंढरपूर येथील विठु रखुमाई मंदिरात तुळशीपुजन व नामदेव पायरी येथे महाआरती व मतदारसंघात रक्तदान शिबीर आणि वृक्षलागवड व संवर्धनाच्या संकल्पाने उत्साहात साजरा करण्यात आला. आज पंढरपूर येथे आमदार श्री समाधान(दादा)आवताडे साहेब यांनी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिरात तुलसीपुजनाच्या माध्यमातून व नामदेव पायरी येथे महाआरतीतून मुख्यमंत्री महोदयांच्या दीर्घायुष्याकरिता व निरोगी आयुष्याकरिता मंगलमय वातावरणात मनोकामना केली .

आज जन्मदिनाचे औचित्य साधत जाहिरात, होर्डिंग, मनोरंजनाच्या कार्यक्रमांवर अनावश्यक खर्च न करता संपुर्ण पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात आमदार श्री समाधान दादा आवताडे



यांच्या माध्यमातून महारक्तदान शिबिरे तसेच ५५,५५५ झाडांचे वृक्षारोपन व संवर्धन असे व यांसारखे अनेक सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत सेवा दिन म्हणून हा जन्मदिन साजरा केला जात आहे.

मा. देवेंद्रजींच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण मतदारसंघात व राज्यात ही''महाराष्ट्र सेवकाचा वाढदिवस'' हा खऱ्या अर्थाने सेवाभाव व समर्पित कार्यातून साजरा होतो आहे, हीच नेतृत्वाची खरी ओळख आहे असे प्रतिपादन आमदार दादाश्री यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

## देवाभाऊंचा वाढदिवस माऊलीभाऊ कडून सेवाभाव म्हणून साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ईश्वर वठार/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष व कणखर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त मौजे ईश्वर वठार ता. पंढरपूर येथे देवा भाऊंचा वाढदिवस माऊली भाऊ यांच्याकडून सेवाभाव म्हणून साजरा करण्यात आला.



येथील जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सरपंच नारायण देशमुख यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे व खाऊचे वाटप करून आगळ्या वेगळ्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी बोलताना माऊली हळणवर म्हणाले की देवेंद्र फडणवीस हे गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्र प्रथम व सेवाभाव या वृत्तीने राज्यामध्ये काम करीत आहेत. वंचित,शोषित,पीडितांचा कैवार घेत प्रस्थापितांच्या विरोधात विस्थापितांना राज्याच्या राजकारणामध्ये संधी देत आहेत. देवेंद्र फडणवीस यांची दूरदृष्टी या महाराष्ट्राला आधुनिक युगाकडे घेऊन जात आहे. म्हणून आमचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसासाठी संपूर्ण राज्यभरातील कार्यकर्ते हे विक्रमी रक्तदान करत असून याचे जागतिक रेकॉर्ड होणार आहे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता विभागाला अनेक जण आपले योगदान देत आहेत तसेच जिल्हा परिषद शाळेत गोरगरिबांची मुले शिकत असतात फुले,शाहू, आंबेडकरांच्या विचारसरणीनुसार शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते घेतल्यामुळे माणूस गुरगरल्याशिवाय राहत नाही. गोर गरिबांच्या पोरांना शैक्षणिक साहित्याचा अभाव असतो यामुळे सेवाभाव जपण्यासाठी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना सहकार्य म्हणून आज ईश्वर वठार येथील शाळेमध्ये सरपंच नारायणराव देशमुख यांचे शुभ हस्ते व माऊली भाऊ हळणवर यांचे उपस्थित साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष आण्णासाहेब देशमुख, ज्ञानेश्वर गुंडगे, सोमनाथ खांडेकर, युवराज देशमुख, प्रशांत लवटे, अजय सरवदे, बापू बोरकर, संतोष मेटकरी, महेश सरवदे, अक्षय बोरकर, धनाजी देशमुख, बिराप्पा खरात, महादेव खांडेकर यांचेसह शिक्षक अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रम भाजपचे राज्याचे सचिव माऊली भाऊ हळणवर व सहकारी यांनी राबविला होता.

### इंदापूर तालुक्यातील नागरिकांची मागणी — तहसीलदार व पोलिस निरीक्षकांना दिले निवेदन

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अवमान प्रकरणी कठोर कारवाई करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर : अतुल सोनकांबळे : इंदापूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती त्रिशताब्दी महोत्सव समिती वतीने अहिल्यादेवी यांच्या विषयी अपमानास्पद फेसबुक पोस्ट केल्या प्रकरणी सुनील उभे याच्यावर तातडीने कायदेशीर कडक कारवाई करावी यासाठी इंदापूर येथील नागरिकांनी जाहीर निषेध केला.




निषेध करते वेळी जयंती महोत्सव समितीच्या विजयाताई कोकाटे म्हणाल्या की अलीकडच्या काळामध्ये महापुरुष बद्दल अश्लील व चुकीचे बोलण्याची संख्या समाजामध्ये वाढू लागलेली आहे. ही गुन्हेगारी प्रवृत्ती ठेचुन काढली पाहिजे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आमच्या आदर्श आहेत .पुणे येथील सुनील उभे कठोर कारवाई करावी म्हणजे असे अवमान भविष्यात कोण करणार नाही . अशी संतापजनक पोस्ट करणे म्हणजे जाणीवपूर्वक समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. अशा शब्दात कोकाटे यांनी तीव्र निषेध व्यक्त केला.

निषेध सभेनंतर इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे व इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सुर्यकांत कोकणे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदन देते वेळी पुणे जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे कार्याध्यक्ष शिवाजीराव मखरे ,राष्ट्रसेवा दल प्रशासक मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा कृष्णा ताटे, इंदापूर तालुका शिवसेनाप्रमुख नितीन शिंदे, पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे अल्पसंख्यांक अध्यक्ष गफूर भाई सय्यद, इंदापूर शहर शिवसेनाप्रमुख महादेव सोमवंशी, पोपट पवार,इंदापूर अर्बन बँकेचे संचालक अविनाश कोथमीरे, प्रशांत उंबरे,अमोल मिसाळ , संजय शिंदे, आप्पा माने, हमीदभाई अत्तार, माऊली नाचण, विकास खिल्लारे लक्ष्मणराव तरंगे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## हिंदुस्तान रत्न पुरस्काराने शेगावच्या मिस एशिया वर्ल्ड गायत्री रोहनकरचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सौंदर्य, आत्मविश्वास आणि मेहनतीच्या जोरावर जागतिक स्तरावर आपली छाप पाडणाऱ्या शेगावच्या सुपुत्री, मिस एशिया वर्ल्ड २०२५ विजेती गायत्री रोहनकर हिचा 'मुंबई येथे हिंदुस्तान रत्न पुरस्कार' देऊन भव्य सन्मान करण्यात आला.




मुंबई ग्लोबल अँड मुंबई इव्हेंट कंपनीच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठित हिंदुस्तान रत्न पुरस्कार, दिनांक १८ जुलै रोजी मुंबई येथे आयोजित भव्य समारंभात गायत्रीला प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात प्रसिद्ध सिने पार्श्वगायक उदित नारायण यांच्या हस्ते आणि राजकुमार तिवारी यांच्यासह अनेक फिल्मसिटीतील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान देण्यात आला.

गायत्रीच्या पुरस्कार स्वीकाराच्या क्षणी संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या गजरात दुमदुमून गेले. तिच्या यशाची दखल घेत अनेकांनी उभे राहून अभिवादन केले.

गायत्री रोहनकरने आजवर विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धांमध्ये भाग घेऊन एकूण १८ पुरस्कार मिळवले आहेत. नुकत्याच दुबई येथे झालेल्या 'एशिया वर्ल्ड २०२५' स्पर्धेत तिने विजेतेपद पटकावून भारताचे नाव उज्ज्वल केले.

शेगावसारख्या छोट्या शहरातून येऊन जागतिक मंचावर आपली ओळख निर्माण करणारी गायत्री रोहनकर आज देशभरातील तरुणींना प्रेरणा ठरत आहे.

# स्वातंत्र्याला ७८ वर्ष उलटूनही राऊत पाड्यातील विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांचा चिखलातून प्रवास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

स्वातंत्र्याला ७८ वर्ष उलटूनही भिवंडी तालुक्यातील खंबाळा ग्रामपंचायत हद्दीतील राऊत पाड्यातील ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांचा खडतर प्रवास सुरूच असून ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांना चिखला-तून वाढ काढावी लागत आहे.त्यामुळे गावकऱ्यांमधून संबंधित प्रशासनाच्या विरोधात संताप व्यक्त केला जात असून डांबरी किंवा काँक्रिटीकरणाची पायवाट करण्याची मागणी केली जात आहे. त्यानुषंगाने येथील राऊत पाड्यात २०० हून अधिक नागरी वस्ती आहे.

दरम्यान सदर पाडा हा ग्रुप ग्राम पंचायत खंबाळा आणि दाभाड या दोन ग्रामपंचायत हद्दीत येत आहे. तर या पाड्यातील नागरिकांना ये जा करण्यासाठी मुख्य रस्ता हा दोन्ही ग्राम पंचायत हद्दीतून जात आहे.परंतु काही शेतकऱ्यांच्या जागा या कच्च्या चिख्खल पायवाट रस्त्यामध्ये येत आहे.त्यामुळे असे शेतकरी रस्ता बांधकामासाठी म ज्जाव करीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.विशेष म्हणजे खंबाळा, दाभाड ग्रामपंचायत प्रशासनाने राऊत पाड्यातील रस्ता व्हावा याकरिता यासाठी भिवंडी तहसीलदार कार्यालयात लेखी निवेदनाद्वारे प्रस्ताव सादर केला आहे. दरम्यान ग्रामपंचायतीच्या निवेदनान-ुसार राऊत पाडा, परशुराम पाड्याकरिता रस्ता पिढी जात वहिवाटीचा असून सदर रस्ता तातडीने तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे.तसेच सदर रस्ता तात्काळ न बनवल्यास राऊत पाड्यातील ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा इशाराही दिला आहे.त्याम ुळे येत्या स्वातंत्र्य दिनाच्या ७९ व्या वर्षी तरी राऊत पाड्यातील विद्यार्थी आणि ग्रामस्थांची चिखलातील वाट मोकळी होणार का ? याकडे येथील ग्रामस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.

# पानीवचे सुपुत्र जवान यशवंत बाबर यांना वीरमरण

## आज पानीव येथे होणार लष्करी इतमामात अंत्यसंस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पानीव (ता. माळशिरस) : पानीव गावाचे सुपुत्र व भारतीय लष्करातील जवान हवालद-ार यशवंत भानुदास बाबर (वय ५५) यांना रविवारी (ता. २० जुलै २०२५) मध्यरात्री १ वाजता कोची (केरळ) येथे ड्युटीवर असताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने वीरमरण प्राप्त झाले.

गेल्या ३५ वर्षांपासून भारतीय लष्करात सेवा बजावत असलेले यशवंत बाबर सध्या कोची येथील संरक्षण सुरक्षा दलात कार्यरत होते. देशसेवेच्या पवित्र कार्यात तन-म नाने समर्पित राहून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रसेवेसाठी अर्पण केले.

त्यांच्या निधनामुळे पानीव गा-वासह संपूर्ण माळशिरस तालुक्यावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने गाव एक शूर, निष्ठावान आणि कर्तव्यदक्ष सैनिक गमावला आहे.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व भाऊ असा आप्तपरिवार आहे. बाबर कुटुंबावर या दुःखद घटनेने दुःखाचा



डोंगर कोसळला आहे.

मंगळवारी सकाळी कोची येथील लष्कराच्या मुख्य कार्यालयात त्यांना लष्करी मानवंदना दिल्यानंतर त्यांचे पार्थिव विमानाने पुणे येथे रात्री नऊ वाजेपर्यंत पोहोचेल तिथून लष्करी वाहनाने मध्यरात्रीपर्यंत पानीव गावात दाखल होणार असून, बुधवारी सकाळी १० वाजता लष्करी इतमामात पानीव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, पानीव ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने याबाबतची सर्व व्यवस्था करण्यात आल्याची माहिती प्रकाश पाटील यांनी दिली.

हवालदार यशवंत बाबर यांच्या अतुलनीय सेवेबद्दल संपूर्ण गावकऱ्यांना अभिमान आहे. त्यांच्यावरील ही अपार दु:खद घटना सर्वांसाठी अत्यंत वेदनादायक आहे

चौकट

वीर जवान यशवंत बाबर यांचा सैनिकी प्रवास

*जम्मू व काश्मीर येथे सलग १५ वर्षे देशसेवा करत देशाच्या संवेदनशील आणि सीमेवरील भागात त्यांनी अत्यंत धैर्याने सेवा बजावली.

*त्यानंतर जैसलम ेर (राजस्थान) येथे शुष्क सीमाभागात

*पुणे (महाराष्ट्र) येथे प्रशिक्षण व प्रशासकीय जबाबदाऱ्या

*सिकंदराबाद (आंध्रप्रदेश) येथे दक्षिण भारतात

*जबलपूर (मध्यप्रदेश) येथे मध्य भारतात

या विविध भागांमध्ये त्यांनी कर्तव्य बजावले.

*केवळ दोन महिन्यांपूर्वीच



त्यांची बदली कोची (केरळ) येथे झाली होती, जिथे त्यांनी १३०७ उæउ झङ जडड मध्ये सेवा बजावत होती.

*विशेष म्हणजे, येणाऱ्या एका वर्षातच त्यांची लष्करातून सेवानिवृत्ती होणार होती.

परंतु त्याआधीच ड्युटीवर असताना त्यांना वीरमरण प्राप्त झाले.

# वृक्षारोपण व वृक्ष संगोपन ही काळाची गरज : डॉ. खजुरे






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के.गायकवाड : वृक्षारोपन आभियान ही सतत चालणारी प्रक्रिया असून पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने वृक्षारोपना बरोबरचं वृक्ष संगोपन करणे ही काळाची गरज आहे.असे प्रतिपादन जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.सिद्रामाप्पा खजुरे (खुदावाडी) यानी गुजनूर ता.तुळाजापूर येथे बोलताना केले.

हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र, एक पेड माँ के नाम या शासनाच्या आभियाना अंतर्गत धाराशीव जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या हरित धाराशिव आभियान - २०२५ च्या वतीने गुजनूर ता.तुळजापूर येथे शासकीय गावठान जमि नीवर वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे आयोगजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ.खजुरे उदघाटक म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी गुजनूरचे विद्यामान सरपंच फूलचंद वाघमारे हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून शहापूरचे सरपंच उमेश गोरे, उपसरपंच नानासाहेब पाटील, गुजनूर चे उपसरपंच, व्यकट साळूंके, तंटामुक्त अध्यक्ष साहेबराव साळूंके, शहपूर तंटामुक्त अध्यक्ष तुकाराम जाधव, सामाजिक कार्यकर्ते भास्कर सुरवसे, डॉ.यशवंत नरवडे, उप कृषी अधिकार डी.पी.बिराजदा,आदी उपस्थित होते.

या उपक्रमामध्ये जिल्हा प्रशासनातील महसुल, कृषी, बांधकाम, शैक्षणिक सह सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी गुजनूर, शहापूर, गुळहळ्ळी आदी गावातील अशा कार्यकर्त्या, अंगणवाडी कार्यकर्त्या, उम ेदच्या सिआरपी,महिला,युवा कार्यकर्ते, शहापूर, गुजनूर येथिल जि.प. प्राथमिक शाळ, छत्रपती शिवाज विद्यालय शहापूर आदी गावातील शालेय विद्या-र्थी, मुख्याध्यापक, शिक्षक.ग्रामस्थानी सहभाग नोंदविला होता. प्रारंभी विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी येथील शासकीय गायरान जमि नीवर विविध प्रकारची तिन हजार व्रक्षाच्या रोपांचे वृक्षारोपन करण्याचे नियोजन करण्यात आले होते. या प्रसंगी,ग्राम महसुल अधिकारीआर.बी.पाटील मॅडम, सहाय्यक कृषी अधिकारी यू. टी. कर्ले मॅडम,मंडळ कृषी अधिकारी सत्यजीत देशमुख, बांधकाम शाखाआभियंता जी.टी.घाटे, ग्राम पंचायत अधिकारी प्रशांत कुंभार, जी.आर.जमादार,पोखरा अभियानाचे स्वयंमसेवक जितेंद्र माने,श्रीमंत सुरवसे, हरीष सुरवसे,आरविंद जगताप,सामाजिक कार्यकर्ते जयभीम वाघमारे,अक्षय सुरवसे, मोहन व्हंताळे,किशोर वाघमारे,सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# जगातील पहिले एआय सहलेखक असलेले बालकथांचे पुस्तक प्रकाशित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हार्ट पब्लिकेशनच्या वतीने अत्यंत अभिमानाने फ्लाइंग विदाऊट विंग्ज हे नवे आणि वैशिष्ट्यपूर्ण बालकथांचे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. हे पुस्तक लिहिले आहे अवघ्या ९ आणि ८ वर्षांच्या दोन लहान लेखकांनी-वीरा शिंदे आणि शौर्या शिंदे, जे सेंट मिरा प्रायमरी स्कूल, पुणे येथील विद्यार्थीनी आहेत-आर्टिफिशियल






इंटेलिजन्सच्या (AI) मदतीने! हे पुस्तक केवळ कथांचे संकलन नाही, तर हे आहे एक सर्जनशीलतेचा उत्सव. वीरा आणि शौर्या यांनी ख च्या मदतीने सुंदर कथा तयार केल्या, त्या चित्रित केल्या आणि त्यात जीवनमूल्ये गुंफली आहेत. जगात प्रथमच एवढ्या लहान वयातल्या मुलांनी ख चा वापर करून पुस्तक निर्माण केल्याचा हा ऐतिहासिक क्षण आहे. या पुस्तकातील प्रत्येक कथा वेगळी आहे-उडण्याचे स्वप्न पाहणारी मुंगी, जादुई युनिकॉर्न, लोभी स्त्रीचा परिवर्तन, पर्यावरणाची जाणीव, आणि प्राण्यांशी संवाद साधणारे मुलं-या सगळ्या कथा मुलांमध्ये मोलाचे संस्कार रुजवतात.

या पुस्तकात QR कोडच्या माध्यम ातून एक खास गाणेही दिले आहे, जे या मुलांनीच AI च्या सहाय्याने तयार केले आहे. कव्हर डिझाइनपासून ते गीत-संगीतापर्यंत सर्व गोष्टींमध्ये या मुलांचा सहभाग आहे. फ्लाइंग विदाऊट विंग्ज हे पुस्तक हार्ट पब्लिकेशनने प्रकाशित केले असून, लवकरच डिजिटल स्वरूपातही उपलब्ध होणार आहे. हे पुस्तक म्हणजे नव्या पिढीच्या कल्पनाशक्तीचा आणि तंत्रज्ञानाच्या योग्य वापराचा सुंदर संगम आहे.

# उपक्रमशील विज्ञान शिक्षक पी.आर.करपे यांना फिलोशिप मिळाल्याबद्दल सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी:- म राठा विद्या प्रसारक समाज संस्था माजी विद्यार्थी संघटना यांच्यावतीने देण्यात येण-ारी त्रिरश्मी शिक्षक फिलोशिप पुरस्कारासाठी डुबेरे जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील उपक्रमशील विज्ञान शिक्षक पी.आर.करपे यांना जाहीर झाली आहे .

शैक्षणिक क्षेत्रात केलेले उत्कृष्ट योगदान , त्यांनी जिल्ह्यात प्रथमच इस्रो या ठिकाणी विद्यार्थ्यांची वैज्ञानिक सहल आयोजित केली,आयसर पुणे येथे ५० विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक उपक्रमासाठी भेट घडून आली, टीआयफआर मुंबई या ठिकाणीही विज्ञानामध्ये रुची असलेल्या विद्यार्थ्यांची भेट घेऊन



आणली होती. विद्यालयातील म ाजी विद्यार्थ्यांकडून निधी मिळून दरवर्षी ६० ते ७० विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व इतर साहित्य पुरवण्याचे कामही त्यांनी केले. विज्ञान प्रदर्शनामध्ये आत्तापर्यंत तालुकास्तरीय ते देशपातळीपर्यंत अनेक बक्षीस मिळवली, वैज्ञानिक हस्तलिखित, वैज्ञानिक लेख असे राबवलेले नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दाखव-लेली समर्पित भावना या बाबी विचारात घेऊन करपे यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यांना रुपये २५ हजारची रोख रक्कम तसेच सन्म ानचिन्ह मिळणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानीशालेय समितीचे अध्यक्ष नारायण शेठ वाजे होते.व्यासपीठावर उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वाम ने, श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे व्हा. चेअरमन अरुण वारुंगसे,भाऊ रखमा वारुंगसे,विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले,पर्यवेक्षक उल्हास पवार आदीं मान्यवर उपस्थित होते. करपे यांना फेलोशिप जाहीर झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. उपस्थित सर्वच मान्यवरांनी त्यांना पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिल ससाणे यांनी केले तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले.

त्यांना ही फेलोशिप मि ळाल्याबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ड नितीन ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत, संस्था माध्यमि क विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.भास्कर ढोके, माजी विद्यार्थी संघटना संचालक डॉ.धनंजय चव्हाण, विलास शिंदे आदिंसह विविध मान्यवर, शिक्षक, शिक्षकेतर सेवक वृंद, विद्यार्थी यांनी कौतुक केले आहे.

**मुख्यमंत्री ना.फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विक्रमी रक्तदान व ५५,५५५ वृक्ष लागवड संकल्प**

**आ समाधान आवताडे यांचे प्रतिपादन**

# मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस हे कृतिशील बांधिलकी आणि लोककल्याणाचा दृष्टिकोन याला समर्पित असणारे व्यक्तिमत्व

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीच्या वतीने विधानसभा म तदारसंघांमध्ये भव्य महारक्तदान शिबिर आणि वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात घेण्यात आले. पर्यावरण रक्षण आणि सामाजिक भान जपत या दोन्ही उपक्रमांना मतदारसंघातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पंढरपूर येथे आ समाधान आवताडे यांनी श्री भगवंत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची आरती करुन तुळशी पूजन




केली. त्याचबरोबर माचणूर येथील श्री सिद्धेश्वर हुलजंती येथील श्री म हालिंगराया, हुन्नूर येथील श्री बिरोबा लक्ष्मीदहिवडी येथील लक्ष्मीद-ेवी मंगळवेढा शहर येथे दामाजी पंत व संत चोखामेळा यांना स्थानिक पदाधिकाऱ्यांनी देव अभिषेक करुन दीर्घायुष्य साठी प्रार्थना करण्यात आली. संपन्न झालेल्या समाजा-तील गरजुंना नवजीवन देणाऱ्या या



रक्तदान रक्तदान शिबिराच्या माध्यम ातून मंगळवेढा तालुक्यातील बोराळे, हुलजंती, शिरनांदगी, लक्ष्मी दहिवडी येथे तर पंढरपूर तालुक्यात गादेगांव, लक्ष्मी टाकळी, तावशी व अनवली या ठिकाणी ७८४ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली आहे.

त्याचबरोबर मुख्यमंत्री ना.फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात ५५,५५५ वृक्ष लागवड व संवर्धन करण्याचा संकल्प केला आहे. या वृक्षारोपण व संवर्धन संकल्पाचा शुभारंभ मंगळवेढा शहरातील इंग्लिश स्कूल येथे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुजित कदम यांच्या नियोजनातून आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते छोटेसे रोपटे लावत करण्यात आला. यावेळी उपस्थित राहून ग्राम स्थांना वृक्ष लागवड व संवर्धनाचे महत्त्व आ आवताडे यांनी यावेळी समजावून सांगितले.

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी गोरगरिबांच्या सेवेसाठी आणि सकल राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी व विधायक प्रगतीसाठी केलेली कृतिशील बांधिलकी आणि त्यांचा लोककल्याणाचा दृष्टिकोन याला समर्पित भावनेतून ही दोन्ही शिबिरे आयोजित करण्यात आले होती असे प्रतिपादन आमदार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले आहे.

याप्रसंगी तहसीलदार मदन जाधव, तालुका कृषी अधिकारी मनिषा मि साळ -जाधव, सामाजिक वनीकरण च्या शितल चाटे तसेच विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी म हायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते सर्व मंडल अध्यक्ष, यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दोन्ही उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.